**(आठ) ज्यामध्ये सल्ला देण्याकरिता दोन किंवा अधिक व्यक्तींचे घटक असणाऱ्या मंडळात, परिषदेत,समितीत अथवा इतर संस्थांमध्ये त्या मंडळाच्या परिषदेच्या समितीच्या बैठका. त्यांचे इतिवृत्त ह्या जनतेसाठी खुल्या आहेत.**

**भूजल मत्स्यव्यवसाय –**

## १. जिल्हास्तरीय तलाव ठेका समिती

राज्यातील पाठबंधारे तलाव ठेक्याने देण्यासाठी जिल्हास्तरीय समिती शासन निर्णय दिनांक २५ फेब्रुवारी १९९१ अन्वये स्थापन करण्यात आली असून ती खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| अ) प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक | अध्यक्ष |
| ब) सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक | सदस्य |
| क) जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी | सदस्य सचिव |
| ड) मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी | सदस्य |
| इ) जिल्हा संघाचा प्रतिनिधी | सदस्य |

## २. राज्यस्तरीय तलाव ठेका समिती

राज्यातील पाठबंधारे जलाशय ठेक्याने देण्यासाठी जिल्हास्तरीय समिती शासन निर्णय दिनांक ०८ ऑगस्ट २००२ अन्वये स्थापन करण्यात आली असून ती खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| अ) आयुक्त (मत्स्यव्यवसाय) | अध्यक्ष |
| ब) उपसचिव (मत्स्यव्यवसाय) | सदस्य |
| क) उपसचिव (पाटबंधारे) | सदस्य |
| ड) उपसचिव (वित्त विभाग) | सदस्य |
| इ) संबंधित प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर | सदस्य |
| ई) मत्स्यव्यवसाय उपसंचालक (भूजल) | सदस्य सचिव |

## ३. विभागीय खरेदी समिती

**३. (अ) खरेदी समिती :-** शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. एसपीओ-१०७७/६०९६३/(सीएसपीओ-५७२)/इन्ड-६, दिनांक २१ फेब्रुवारी १९७८ व शासन निर्णय भांखस १०८८/(२५१२)/उद्योग-६, दिनांक २ जानेवारी १९९२ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारान्वये मत्स्यव्यवसाय विभागाची खरेदी समितीची पुनर्रचना करण्यात आली असून या समितीत खालीलप्रमाणे सदस्य असतीलः-

| | |
|---|---|
| अ) मा. आयुक्त, मत्स्यव्यवसाय | अध्यक्ष |
| ब) उप सचिव (पदुम) (मत्स्य) | सदस्य |
| क) प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक, मुंबई | सदस्य |
| ड) मत्स्यव्यवसाय उपसंचालक (भूजल) | सदस्य |
| इ) सहसंचालक, भांडार खरेदी, उद्योग संचालनालय अथवा त्यांना नियुक्त केलेला अधिकारी | सदस्य |
| ई) लेखाधिकारी, आयुक्त कार्यालय | सदस्य |
| उ) मत्स्यव्यवसाय उपसंचालक (सागरी) | सदस्य सचिव |

**३. (ब) निवेदन समिती :-** खरेदी समितीने त्यांच्या कार्यकक्षेत पुरवठादार निश्चित करण्याबाबत / दरपत्रक स्विकारणे इत्यादीबाबत केलेल्या कार्यवाहीविरुध्द काही निवेदने प्राप्त झाल्यास अशा प्रकारच्या तक्रारी, निविदांची छाननी, दंड अथवा त्यामध्ये सूट देणे यासंबंधी पुरवठादारांकडून आलेल्या तक्रारींची तपासणी करण्यासाठी शासन मत्स्यव्यवसाय विभागात पुढीलप्रमाणे एक निवेदन समिती गठित करीत आहे. त्याबाबतीतील समितीचा निर्णय अंतिम राहील.

| | |
|---|---|
| अ) प्रधान सचिव (पदुम) | अध्यक्ष |
| ब) आयुक्त, मत्स्यव्यवसाय | सदस्य |
| क) उप सचिव, वित्त विभाग/त्यांचा प्रतिनिधी | सदस्य |
| ड) मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, उद्योग संचालनालय यांचा प्रतिनिधी | सदस्य |
| ई) प्राध्यापक वा डिन, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर | सदस्य |
| उ) उपसचिव (पदुम) (मत्स्य) | सदस्य सचिव |

## ४. मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणाः-

शासन निर्णय क्र. मत्स्यवि-१४०९/प्र.क्र.११/०९/पदुम-१३ दिनांक २० फेब्रुवारी, २०१० अन्वये मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा ही योजना राबविण्यासाठी प्रत्येक जिल्हयात व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीची रचना खालीलप्रमाणेः

### "व्यवस्थापन समिती"

| | | |
|---|---|---|
| १. संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी | - | अध्यक्ष |
| २. प्रादेशिक उपायुक्त, मत्स्यव्यवसाय | - | सदस्य |
| ३. संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी | - | सदस्य |
| ४. सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय (तांत्रिक) | - | सदस्य सचिव |
| ५. कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग | - | सदस्य |
| ६. कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद | - | सदस्य |
| ७. व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक | - | सदस्य |
| ८. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) | - | सदस्य |
| ९. अध्यक्ष, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | - | सदस्य |
| १०. अध्यक्ष, जिल्हा मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचा संघ | - | सदस्य |

## निमखारे पाणी विभाग

### १. जिल्हास्तरीय समिती

तटीय जलकृषी प्राधिकरण कायदा २००५ अंतर्गत केंद्र शासनाने प्रसिध्द केलेले परिपत्रक दिनांक २२ डिसेंबर २००५ नुसार जलकृषीशेतीची (Aquaculture Farms) नोंदणी व नुतनीकरण यासाठी जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली असून ती खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| अ) जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| ब) राज्याचे महसूल विभागाचा प्रतिनिधी | सदस्य |
| क) राज्याचे कृषी विभागाचा प्रतिनिधी | सदस्य |
| ड) राज्याचे पर्यावरण विभागाचा प्रतिनिधी | सदस्य |
| इ) संबंधित जिल्हा परिषदेचा प्रतिनिधी | सदस्य |
| ई) सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (संबंधित जिल्हा) | सदस्य सचिव |

### २. राज्यस्तरीय समिती

तटीय जलकृषी प्राधिकरण कायदा २००५ अंतर्गत केंद्र शासनाने प्रसिध्द केलेले परिपत्रक दिनांक २२ डिसेंबर २००५ नुसार जलकृषीशेतीची (Aquaculture Farms) नोंदणी व नुतनीकरण यासाठी जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली असून ती खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| अ) सचिव मत्स्यव्यवसाय विभाग | अध्यक्ष |
| ब) सचिव महसूल विभाग | सदस्य |
| क) सचिव पर्यावरण विभाग | सदस्य |
| ड) सागरी उत्पाद निर्यात विकास प्राधिकरण यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| इ) आयुक्त मत्स्यव्यवसाय | सदस्य सचिव |

### ३. निमखारे पाणी मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणाः-

केंद्र शासनाच्या डेव्हलपमेंट ऑफ इनलँड फिशरीज ॲण्ड ॲक्वाकल्चर योजने अंतर्गत तटीय जिल्हयातील निमखारे पाणी मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा ही योजना राबविण्यासाठी शासन निर्णय क्र. मत्स्यवि-१४०९/प्र.क्र.११/०९/पदुम-१३ दिनांक २० फेब्रुवारी, २०१० अन्वये तटीय जिल्हयात व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीची रचना खालीलप्रमाणेः

#### "व्यवस्थापन समिती"

| | | |
|---|---|---|
| १. संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी | - | अध्यक्ष |
| २. प्रादेशिक उपायुक्त (मत्स्य), मुंबई | - | सदस्य |
| ३. कार्यकारी अभियंता, कृषि बांधकाम विभाग | - | सदस्य |
| ४. संबंधित जिल्हयांचे अति मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) | - | सदस्य |
| ५. मत्स्य संवर्धकांचे दोन प्रतिनिधी | - | सदस्य |
| ६. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक) | - | सदस्य सचिव |

**<u>सागरी विभागः</u>**

१. **<u>महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ अंतर्गत जिल्हा सल्लागार समिती :-</u>**

महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ अंतर्गत कलम ३ अन्वये राज्यशासनास प्रदान केलेल्या अधिकारानुसार प्रत्येक किनारी जिल्हयासाठी खालीलप्रमाणे एक सल्लागार कमिटीची रचना करता येईल.

| | |
|---|---|
| अ) जिल्हा दंडाधिकारी | सभापती |
| ब) राज्य बंदर विभागाचे प्रतिनिधी | सदस्य |
| क) पोलिस विभागाचे प्रतिनिधी | सदस्य |
| ड) संबंधित जिल्हयाचे सहाय्यक संचालक मत्स्यव्यवसाय | सदस्य सचिव |

** सभापतीला योग्य वाटेल त्याप्रमाणे तो, शासकीय विभागाचे आणि मच्छीमारांचे व त्या व्यवसायाचे प्रतिनिधी, स्वीकृत करुन घेईल.